| CNR NO.MHLA050011502025 | दाखल दिनांक : – १२/०६/२०२४<br>नोंदणी दिनांक : – १२/०६/२०२४<br>निकाल दिनांक :– १४/०८/२०२६<br>कालावधी:–**०२वर्षे, ०२महिने, ०२दिवस** |
|---|---|

**अतिरीक्त मुख्य न्यायदंडाधिकारी अहमदपूर, यांचे न्यायालयात**

**( पिठासीन अधिकारी – आर.डी. वाबळे )**

**(न्यायनिर्णय अधिघोषित दिनांक – १४.०८.२०२६)**

**नियमित फौजदारी खटला क्र.२९२/२०२४** **निशाणी – ५०**

गुन्हा नोंद क्र.५९१/२०२३, पो. स्टे. अहमदपूर.

| | | |
|---|---|---|
| **अभियोग पक्ष.** | | **महाराष्ट्र शासन,**<br>तर्फे पोलीस स्टेशन, अहमदपूर,<br>ता. अहमदपूर, जिल्हा लातूर. |
| **अभियोग पक्षा तर्फे** | | सहाय्यक शासकिय अभियोक्ता श्रीमती.ए.एन.काकडे |
| आरोपी. | | १. **विठ्ठल गणपती आलेवार,**<br>वय –३४ वर्षे, कामधंदा –खाजगी नोकरी,<br>२. **देवुबाई गणपती आलेवार,**<br>वय –६० वर्षे, कामधंदा –घरकाम,<br>३. **गणपती भागन्ना आलेवार,**<br>वय –६४ वर्षे, कामधंदा –शेती,<br>४. **भागवत गणपती आलेवार,**<br>वय –३७ वर्षे, कामधंदा –शेती, |

| | | |
|---|---|---|
| | | **५. चंद्रकांत गणपती आलेवार,**<br>वय –३६ वर्षे, कामधंदा –किराणा दुकान,<br>**६. बालाजी गणपती आलेवार,**<br>वय –२६ वर्षे, कामधंदा –नोकरी,<br>सर्व रा.हिप्परगा जानेवार, ता.नायगांव,<br>जि.नांदेड.<br>**७. सुजाता राम बोडेवार,**<br>वय –३६ वर्षे, कामधंदा –घरकाम,<br>रा.अतनुर, ता.जळकोट, जि.लातूर.<br>**८. राम दशरथ बोडेवार,**<br>वय –३७ वर्षे, कामधंदा –शेती/मजुरी,<br>रा.अतनुर, ता.जळकोट, जि.लातूर.<br>**९. स्वरुपा बालाजी आंचेवार,**<br>वय –२६ वर्षे, कामधंदा –घरकाम,<br>रा.बालाजी निवास, गुरुद्वारा गेट नं., नांदेड.<br>**१०. बालाजी नारायण आंचेवार,**<br>वय –३५ वर्षे, कामधंदा –नोकरी,<br>रा.बालाजी निवास, गुरुद्वारा गेट नं., नांदेड. |
| **आरोपी तर्फे विधीज्ञ** | | श्री.एन.ए.हिप्परगेकर |

**भाग– ब**

**(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद क्र. ४४(ii)अन्वये)**

| | | |
|---|---|---|
| फिर्याद दाखल दिनांक | | १६.१०.२०२३ |
| दोषारोप पत्र पाठविल्याचा दिनांक | | १२.०६.२०२४ |
| दोषारोप निश्चित केल्याचा दिनांक | | १९.०१.२०२६ |

| | | |
|---|---|---|
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | | २९.०१.२०२६ |
| न्यायनिर्णयासाठी राखूण ठेवल्याचा दि. | | १४.०८.२०२६ |
| न्यायनिर्णय दिनांक | | १४.०८.२०२६ |
| न्यायनिर्णयातील शिक्षे संदर्भात आदेशाचा दिनांक | | निरंक, आरोपींची निर्दोष मुक्त करण्यात येते. |

## आरोपीचा तपशील

| आरोपीं क्र. | आरोपींचे नावे | अटक दिनांक | जामिनावर सोडल्याचा दि. | गुन्हयाचे कलम | अंतिम आदेश | शिक्षा | फौ. प्र. सं. क. ४२८ अन्वये समायोजीत (**Set off**) करणे बाबत कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१. | **विठ्ठल गणपती आलेवार** | दि.०४.१२.२३ फौ.प्र.सं. कलम ४१–अ प्रमाणे नोटीस | दि.१९.०१.२६ | भा.दं.सं. कलम ४९८(अ), ३२३, ५०४, ५०६ सह ३४ | निर्दोष मुक्त | निरंक | निरंक |
| ०२ | **देवुबाई गणपती आलेवार** | दि.०४.१२.२३ फौ.प्र.सं. कलम ४१–अ प्रमाणे नोटीस | दि.१९.०१.२६ | भा.दं.सं. कलम ४९८(अ), ३२३, ५०४, ५०६ सह ३४ | निर्दोष मुक्त | निरंक | निरंक |
| ०३ | **गणपती भागन्ना आलेवार** | दि.०४.१२.२३ फौ.प्र.सं. कलम ४१–अ प्रमाणे नोटीस | दि.१९.०१.२६ | भा.दं.सं. कलम ४९८(अ), ३२३, ५०४, ५०६ सह ३४ | निर्दोष मुक्त | निरंक | निरंक |
| ०४ | **भागवत गणपती आलेवार** | दि.०४.१२.२३ फौ.प्र.सं. कलम ४१–अ प्रमाणे नोटीस | दि.१९.०१.२६ | भा.दं.सं. कलम ४९८(अ), ३२३, ५०४, ५०६ सह ३४ | निर्दोष मुक्त | निरंक | निरंक |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०५ | **चंद्रकांत गणपती आलेवार** | दि.०४.१२.२३ फौ.प्र.सं. कलम ४१–अ प्रमाणे नोटीस | दि.१९.०१.२६ | भा.दं.सं. कलम ४९८(अ), ३२३, ५०४, ५०६ सह ३४ | निर्दोष मुक्त | निरंक | निरंक |
| ०६ | **बालाजी गणपती आलेवार** | दि.१८.०५.२४ फौ.प्र.सं. कलम ४१–अ प्रमाणे नोटीस | दि.१९.०१.२६ | भा.दं.सं. कलम ४९८(अ), ३२३, ५०४, ५०६ सह ३४ | निर्दोष मुक्त | निरंक | निरंक |
| ०७ | **सुजाता राम बोडेवार** | दि.०४.१२.२३ फौ.प्र.सं. कलम ४१–अ प्रमाणे नोटीस | दि.१९.०१.२६ | भा.दं.सं. कलम ४९८(अ), ३२३, ५०४, ५०६ सह ३४ | निर्दोष मुक्त | निरंक | निरंक |
| ०८ | **राम दशरथ बोडेवार** | दि.०४.१२.२३ फौ.प्र.सं. कलम ४१–अ प्रमाणे नोटीस | दि.१९.०१.२६ | भा.दं.सं. कलम ४९८(अ), ३२३, ५०४, ५०६ सह ३४ | निर्दोष मुक्त | निरंक | निरंक |
| ०९ | **स्वरुपा बालाजी आंचेवार** | दि.०४.१२.२३ फौ.प्र.सं. कलम ४१–अ प्रमाणे नोटीस | दि.१९.०१.२६ | भा.दं.सं. कलम ४९८(अ), ३२३, ५०४, ५०६ सह ३४ | निर्दोष मुक्त | निरंक | निरंक |
| १० | **बालाजी नारायण आंचेवार** | दि.०४.१२.२३ फौ.प्र.सं. कलम ४१–अ प्रमाणे नोटीस | दि.१९.०१.२६ | भा.दं.सं. कलम ४९८(अ), ३२३, ५०४, ५०६ सह ३४ | निर्दोष मुक्त | निरंक | निरंक |

## भाग– क

## (फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद क्र. ४४(iii)अन्वये)

| सा.क्र. | साक्षीदारांची नाव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| ०१ | गायत्री विठ्ठल आलेवार | फिर्यादी | ४७ |
| ०२ | बालाजी काशीनाथ | साक्षीदार | ४९ |

| | | | |
|---|---|---|---|
| | पिचकेवार | | |

## अभियोग पक्षातर्फे दाखल करण्यात आलेले दस्त

| द.क्र. | निशाणी | दस्त वर्णन |
|---|---|---|
| ०१ | ४८ | फिर्याद |

## न्यायालया मार्फत निशाणी देण्यात आलेले दस्त

| द.क्र. | निशाणी | दस्त वर्णन |
|---|---|---|
| ०१ | ०१ | दोषारोप पत्र |
| ०२ | ०२ | फेरीस्त |

## बचाव पक्षाचा पुरावा

| द.क्र. | निशाणी | दस्त वर्णन |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

## अभिलेखावरील मुद्देमाल

| म.क्र. | मुद्देमाल क्र. | दस्त वर्णन |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

## न्या य नि र्ण य

(पारीत दिनांक – १४/०८/२०२६)

प्रस्तुत प्रकरण आरोपींविरुध्द भारतीय दंड विधान, १८६० चे कलम

४९८(अ), ३२३, ५०४ व ५०६ सह ३४ अंतर्गत शिक्षेस पात्र असलेल्या गुन्हयांसाठी चालविण्यात आले.

**अभियोग पक्षाची थोडक्यात हकीकत खालीलप्रमाणे** –

**०२.** फिर्यादी गायत्री विठ्ठल आलेवार यांनी अशी फिर्याद नोंदविली की, तिचे लग्न दि.१०/०२/२०१९ रोजी आरोपी क्र.१ सोबत तिच्या आई–वडिलांनी हिंदू रितीरिवाजाप्रमाणे करुन दिले. लग्नामध्ये वरदक्षिणा म्हणून रुपये ८,००,०००/–, दोन तोळे सोने व संसारउपयोगी सर्व साहित्य देवून लग्नाचा खर्च करुन दिले होते. लग्न झाल्यानंतर फिर्यादी सासरी नांदावयास गेल्यानंतर आरोपी क्र.२ ही १५ दिवसांनी फिर्यादीला तुला स्वंयपाक येत नाही, मुलाचे कामे मी करते तू मुलाकडे यायचे नाही म्हणून तिला त्रास देवू लागली. आरोपी क्र.१ हा सुध्दा फिर्यादीला तु माझ्याकडे यायचे नाही, माझी आई माझे काम करेल असे म्हणून तिला त्रास देवू लागला. आरोपी क्र.२ फिर्यादीला तु दिसायला चांगली नाहीस म्हणून त्रास देत होती. आरोपी क्र.१ व २ हे फिर्यादीच्या चारित्र्यावर संशय घेवून तिला रुममध्ये ठेवून बाहेरून कुलूप लावून जात. तसेच, पुण्याला घर बांधण्यासाठी माहेरहून पाच लाख रुपये घेवून ये तर तुला आम्ही चांगल्याप्रकारे नांदवितो असे म्हणाले. फिर्यादीने आरोपींना तिच्या वडिलांची परिस्थिती पैसे देण्यासारखी नाही असे म्हणाली असता सर्व आरोपींनी तिला मारहाण करुन त्रास दिला. त्यानंतर फिर्यादी वडिलांसोबत माहेरी गेली व होणाऱ्या त्रासाबद्दल नातेवाईकांना

सांगितले. त्यानंतर सर्व नातेवाईकांनी फिर्यादीला समजावून सांगून चांगल्याप्रकारे नांदविण्यासाठी आरोपींना दोन लाख रुपये देवून यापुढे आमच्याकडे पैसे मागू नका, फिर्यादीला चांगल्याप्रकारे नांदवा, त्रास देवू नका, मारहाण करु नका असे सांगून तिला सासरी सोडून नातेवाईक गावी आले.

०३. त्यानंतर तीन महिन्यांनी आरोपींनी फिर्यादीला तुझ्या बापाकडून पाच लाख रुपये पुण्यामध्ये घर बांधायचे म्हणून मागितले असता तुझ्या बापाने दोन लाख रुपये दिले बाकीचे राहिलेले तीन लाख रुपये घेवून ये म्हणून तिला सतत त्रास, जाचजुलूम करुन मारहाण करु लागले व पैसे नाही आणले तर खतम करतो अशी जिवे मारण्याची धमकी दिली, म्हणून फिर्यादीने वडिलांना घडला प्रकार फोनवर सांगितला असता तिचे वडील सासरी आले व तिला माहेरी घेवून गेले. त्यानंतर, फिर्यादीने महिला तक्रार निवारण केंद्र, अहमदपूर येथे तक्रार दिली असता आरोपींनी तेथे फिर्यादीला नांदविण्यास नकार दिला. म्हणून, फिर्यादीने अहमदपूर पोलीस ठाणे येथे फिर्याद नोंदविली.

०४. फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरुन पोलीस स्टेशन, अहमदपूर यांनी आरोपींविरुध्द गुन्हा क्रमांक ५९१/२०२३ नोंदविला व पुढील तपास पो.ना. ठाकरे यांच्याकडे वर्ग करण्यात आला. तपासी अंमलदार यांनी तपासकामी घटनास्थळ

पंचनामा केला व साक्षीदारांचे बयाण नोंदविले. तपासाअंती तपासि अंमलदार यांनी आरोपींविरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले.

**०५.** आरोपींविरुध्द **निशाणी क्र.३२** वर दोषारोप नोंदवून तो त्यांना मराठीत वाचून व समजावून सांगितला. आरोपींनी गुन्हा नाकबूल करुन खटला चालविण्याची मागणी केली.

**०६.** अभियोग पक्षाचा पुरावा नोंदवून झाल्यानंतर सबळ पुरावा अभिलेखावर दिसून आला नसल्यामुळे आरोपींचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३-१(ब) अन्वये निवेदन न नोंदविता प्रकरण पुढे चालु ठेवले.

**०७.** प्रस्तुत खटल्याचे निर्णयार्थ खालील मुद्दे माझे विचारार्थ उपस्थित होतात. त्यावरील निष्कर्ष कारण मिमांसेसह खालीलप्रमाणे नोंदविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | लग्नाच्या तीन महिन्यानंतर हिप्परगा जानेवर, ता. नायगांव, जि.नांदेड येथे तुम्ही आरोपींनी आपसात संगनमत करुन फिर्यादीला माहेरहून पाच लाख रुपये घेऊन येण्याची बेकायदेशीर मागणी करुन सतत बेकायदेशीर मागण्यांच्या पुर्ततेकरीता फिर्यादीचा शारिरीक व मानसिक छळ केला व फिर्यादीस क्रूर वागणूक दिली, हे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय ? | **...नकारार्थी** |

| | | |
|---|---|---|
| २. | वर नमुद तारीख, वेळी व ठिकाणी आरोपींनी आपसात संगनमत करुन वर नमूद फिर्यादी यास लाथा बुक्क्यांनी ईच्छापूर्वक मारहाण करुन साधी दुखापत पोहोचविली, हे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय ? | **...नकारार्थी** |
| ३. | वर नमुद तारीख, वेळी व ठिकाणी आरोपींनी आपसात संगनमत करुन वर नमूद फिर्यादीस जाणीवपूर्वक शिवीगाळ करुन अपमानित केले व सार्वजनिक शांततेचा भंग करण्यासाठी फिर्यादीस प्रक्षोभित केले, हे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय ? | **...नकारार्थी** |
| ४. | वर नमूद तारीख, वेळी व ठिकाणी तुम्ही आरोपींनी आपसात संगनमत करुन वर नमूद फिर्यादी यास जिवे मारण्याची धमकी दिली व फौजदारीपात्र धाकदपटशा केला, असे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय ? | **...नकारार्थी** |
| ५. | आदेश काय ? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्रमांक ०१ ते ०४ बाबत :–**

०८. मुद्दे क्र.०१ ते ०४ हे एकमेकांशी संलग्न असून पुनरावृत्ती टाळण्याकरीता एकत्रीत चर्चीले आहेत.

०९. फिर्यादीच्या साक्षीचे अवलोकन करणे गरजेचे आहे. फिर्यादी साक्षीदार क्र.०१ गायत्री विठ्ठल आलेवार, यांनी त्यांच्या साक्षीत सांगितले की, आरोपींसोबत

त्याचा किरकोळ वाद झाला होता. त्यांनी आरोपींविरुध्द तक्रार दिली होती. त्यांनी केवळ त्यांची फिर्याद वरील सही मान्य केली, त्यातील मजकुर माहिती नसल्याचे कथन केले. अभियोग पक्षातर्फे साक्षीदार भारतीय साक्षी पुरावा कायदा, कलम १५४ अन्वये फितूर घोषित करुन साक्षीदाराच्या न्यायालयाच्या परवानगीने सुचक प्रश्न विचारले असता साक्षीदाराने अभियोग पक्षास पुष्टी देणारी कथने नाकारली. सरतेशेवटी त्यांची न्यायालयाबाहेर तडजोड झाल्याचे सांगून फिर्यादी याने अभियोग पक्षास मदत होईल, अशी कोणतीही बाब कथन केली नाही.

**१०.** अभियोग पक्षाने साक्षीदार क्र.०२ बालाजी काशीनाथ पिचकेवार यांना नि.क्र.४९ वर तपासले. त्यांनी त्यांच्या साक्षीत सांगितले की, आरोपींसोबत फिर्यादीचा किरकोळ वाद झाला होता. त्याशिवाय कोणतीही घटना झाली नव्हती. अभियोग पक्षातर्फे साक्षीदार भारतीय साक्षी पुरावा कायदा, कलम १५४ अन्वये फितूर घोषित करुन साक्षीदाराच्या न्यायालयाच्या परवानगीने सुचक प्रश्न विचारले असता साक्षीदाराने अभियोग पक्षास पुष्टी देणारी कथने नाकारली. सरतेशेवटी त्यांची न्यायालयाबाहेर तडजोड झाल्याचे सांगून साक्षीदार याने अभियोग पक्षास मदत होईल, अशी कोणतीही बाब कथन केली नाही.

**११.** उपरोक्त पुराव्याच्या अवलोकनांती अभियोग पक्षावर असे दायित्व येते

की, तथा कथित घटनेच्यावेळी आरोपीं लोकांनी संगनमत करुन फिर्यादीस माहेरहून पाच लाख रुपये घेऊन येण्याची बेकायदेशीर मागणी करुन सतत बेकायदेशीर मागण्यांच्या पुर्ततेकरीता फिर्यादीचा शारिरीक व मानसिक छळ केला व फिर्यादीस क्रूर वागणूक दिली, तसेच लाथा–बुक्क्यांनी मारहाण केली, तसेच शिवीगाळ करून त्यांना प्रक्षोभीत करुन अपमानास्पद वागणुक दिली व जिवे मारण्याची धमकी दिली, हे सिध्द करावे.

१२. सर्वप्रथम अभियोग पक्षाने तथाकथित घटनेतील वेळ व तारीख सिध्द केली का, हे पाहणे गरजेचे आहे. फिर्यादीचे अवलोकन केले असता, याठिकाणी अभियोग पक्षाने नोंदवण्यात आलेले फिर्यादी हे अभियोग पक्षास सहकार्य करत नाहीत. सदर साक्षीदारांच्या व्यतिरीक्त घटनेच्या अनुषंगाने साक्षीदार किंवा तपासिक अधिकारी यांची साक्ष नोंदवून घटनेची वेळ व तारीख सिध्द केली नाही.

१३. अभियोग पक्षाच्या कथना अन्वये फिर्यादीस माहेरहून पाच लाख रुपये घेऊन येण्याची बेकायदेशीर मागणी करुन सतत बेकायदेशीर मागण्यांच्या पुर्ततेकरीता फिर्यादीचा शारिरीक व मानसिक छळ केला व फिर्यादीस क्रूर वागणूक दिली, तसेच लाथा–बुक्क्यांनी मारहाण केली, तसेच शिवीगाळ करून त्यांना प्रक्षोभीत करुन अपमानास्पद वागणुक दिली व जिवे मारण्याची धमकी दिली, असे त्यांच्या साक्षीत

आले नाही. अभियोग पक्षाचे फिर्यादी हे अभियोग पक्षास सहकार्य करत नाहीत.

**१४.** अभियोग पक्षाच्या कथना अन्वये आरोपींनी आपसात संगनमत करुन समान उद्देशाचे पुरसरनार्थ फिर्यादीच्या हातून शांतता भंग किंवा अपराध घडवून आणण्याच्या उद्देशाने तिचा उद्देशपूर्वक अपमान केला व प्रक्षोभित केले. फिर्यादी व साक्षीदाराचे साक्षीचे अवलोकन केले असता, त्यांच्या साक्षीमध्ये असे कोठेही आले नाही की, आरोपींनी फिर्यादीचा अपमान केला व त्याला प्रक्षोभित केले व त्याद्वारे सार्वजनिक शांततेचा भंग झाला. उपरोक्त पुराव्यावरुन अभियोग पक्षाने ठोस, सबळ, विश्वासार्ह पुरावा देऊन आरोपींनी फिर्यादीस फौजदारीपात्र धाकदपटशा केला. त्याचप्रमाणे, सदरचे प्रकरण गैसमजुतीतून दाखल झाले असल्याने त्यांनी उभयतांमध्ये तडजोड करुन प्रकरण निकाली काढण्यास विनंती केली आहे. उभयता भविष्यातील त्यांचे संबंध चांगले रहावेत, या बाबींचा विचार करणे गरजेचे आहे.

**१५.** फौजदारी खटल्यामध्ये आरोपींविरुध्द गुन्हा शाबीत होण्याकरीता गुन्ह्यांचा प्रत्येक टप्पा अभियोग पक्षाने सबळ व निर्विवाद पुराव्यामार्फत शक्यतेच्या पलिकडे जावून सिध्द करणे गरजेचे असते. या प्रकरणी अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेले फिर्यादी यांनी अभियोग पक्षास सहकार्य केले नाही. तसेच या प्रकरणात घटनास्थळ पंच व तपासिक अंमलदार यांची साक्ष नोंदविली नसल्यामुळे अभियोग

पक्षाने याठिकाणी तथाकथित घटनेच्या वेळी आरोपींनी संगनमत करुन फिर्यादीस माहेरहून पाच लाख रुपये घेऊन येण्याची बेकायदेशीर मागणी करुन सतत बेकायदेशीर मागण्यांच्या पुर्ततेकरीता फिर्यादीचा शारिरीक व मानसिक छळ केला व फिर्यादीस क्रूर वागणूक दिली, तसेच लाथा–बुक्क्यांनी मारहाण केली, तसेच शिवीगाळ करून त्यांना प्रक्षोभीत करुन अपमानास्पद वागणुक दिली व जिवे मारण्याची धमकी दिली, या बाबी अभियोग पक्षाने निःशंकपणे सबळ व ठोस पुरावा देऊन सिध्द केल्या नाहीत. त्यामुळे, **मी मुद्दे क्रमांक ०१ ते ०४ चे नकारार्थी** निष्कर्ष नोंदवित आहे.

**मुद्दा क्रमांक ०५ बाबत:–**

१६. **मुद्दे क्रमांक ०१ ते ०४ चे उत्तर नकारार्थी** नोंदविण्यात आल्यामुळे व अभियोग पक्ष, आरोपीं वरील दोषारोप निःसंशयपणे शाबीत करण्यात अपयशी ठरल्यामुळे आरोपीं हे निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहेत. म्हणून मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहेः–

**–ः आ दे श ः–**

१. आरोपी क्र.१ ते १० यांची फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(१) अन्वये भारतीय दंड विधान कलम ४९८(अ), ३२३, ५०४ व ५०६ सह कलम ३४ अंतर्गत शिक्षेस पात्र असलेल्या गुन्हयातून निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. आरोपींचे जामीन बंधपत्रे व जातमुचलके रद्द करण्यात येतात.

३. आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७–अ चे अनुपालनास्तव प्रत्येकी रुपये १५,०००/– चे जामीन बंधपत्र व जातमुचलका सादर करावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर.)

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by WABALE RAMDAS DAULAT
Date: 2026.08.14 15:27:43 +0530

स्थळ – अहमदपूर.

दिनांक –१४/०८/२०२६.

**(आर.डी. वाबळे)**
अतिरीक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,
अहमदपूर